रविवार दि. २८ फेब्रुवारी २०१६

६

गोवन वार्ता

# हळबे महाविद्यालयात मातृभाषा दिन

**दोडामार्ग**: येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात .जागतिक मातृभाषा दिनानिमित्त विविध भाषिक निंबध, वक्तृत्व आणि विविधतेत एकात्मक दर्शविणारे विद्यार्थ्याच्या चित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

यावेळी वक्तृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. तर विविधतेत एकत्मता, संस्कृती भाषेचे महत्व, मातृभाषेचे योगदान या विद्यार्थ्याना अनुसरून विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या चित्रांचे प्रदर्शनही महाविद्यालयात भरविण्यात आले होते. जागतिक पातळीवर २१ फेब्रुवारी हा दिवस मातृभाषा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या विविध भाषांचे महत्त्व देशाच्या आणि राज्याच्या विकासासाठी असाधारण असते.

या निमित्त जागतिक मातृभाषा दिनी या विविध भाषेचा गौरव केला जातो. या कार्यक्रमासाठी प्रा. डॉ. व्ही. ए. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी हिंदी विभाग प्रमुख प्रा.पी.एन.ढेपे यांनी परिश्रम घेतले.